विषय :- ठिबक सिंचन संच उत्पादक कंपन्याच्या नोंदणी नुतनीकरणाबाबत....

**कृषि आयुक्तालय,**
**महाराष्ट्र राज्य,शिवाजीनगर पुणे-४११ ००५.**

कृआआ-२०१८/प्र.म.कृ.सिं.यो./कंनोंनुक/भाग-१/प्र.क्र.०१/२०६३ /फलो-४
पुणे - ४११ ००५, दि. २८ जून,२०१८

**वाचा :-** १) कृषि आयुक्तालयाचे आदेश क्र.कृआआ-२०१६/सुसिंयो/कंपनीनोंदणी/आदेश/ठिबक/प्र.क्र.३७/८५६/फलो-४,दि.०३ सप्टेंबर,२०१६
२) कृषि आयुक्तालयाचे आदेश क्र.कृआआ-२०१६/सुसिंयो/कंपनीनोंदणी/आदेश/ठिबक/प्र.क्र.३७/८६४/फलो-४,दि.०३ सप्टेंबर,२०१६
३) कृषि आयुक्तालयाचे आदेश क्र.कृआआ-२०१६/सुसिंयो/कंपनीनोंदणी/आदेश/ठिबक/प्र.क्र.३७/८९०/फलो-४,दि.०७ सप्टेंबर,२०१६
४) कृषि आयुक्तालयाचे आदेश क्र.कृआआ-२०१६/सुसिंयो/कंपनीनोंदणी/आदेश/ठिबक/प्र.क्र.३७/९०६/फलो-४,दि.०८ सप्टेंबर,२०१६
५) कृषि आयुक्तालयाचे आदेश क्र.कृआआ-२०१६/सुसिंयो/कंपनीनोंदणी/आदेश/ठिबक/प्र.क्र.३७/९१८/फलो-४,दि.१४ सप्टेंबर,२०१६
६) कृषि आयुक्तालयाचे आदेश क्र.कृआआ-२०१६/सुसिंयो/कंपनीनोंदणी/आदेश/ठिबक/प्र.क्र.३७/९४१/फलो-४,दि.१७ सप्टेंबर,२०१६
७) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचना फ.नं.११-१४२/२०१५-हॉर्ट,दि.२५ ऑगस्ट,२०१७
८) शासन पत्र ssy-0318/C.R.98/14-A, दि.१५.०६.२०१८ सोबतचे प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजनेंतर्गत ६ व्या राज्यस्तरीय मान्यता समितीचे इतिवृत्त.

## आदेश

सन २०१६-१७ मध्ये सुक्ष्म सिंचन योजनांतर्गत सुक्ष्म सिंचनाची कामे करण्यासाठी ७७ ठिबक सिंचन संच उत्पादक कंपन्यांना नोंदणीस मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. उपरोक्त वाचा येथिल (अ.क्र.५) दिनांक १५ जून,२०१८ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजनेंतर्गत ६ व्या राज्यस्तरीय मान्यता समितीच्या दि.२५ मे,२०१८ रोजी आयोजीत बैठकीच्या इतिवृतांतातील चर्चा / सूचना / निर्णय मधिल परिच्छेद ६ मध्ये निम्नस्वाक्षरिकार यांनी नोंदणी मान्यता देण्यात आलेल्या सुक्ष्म सिंचन संच उत्पादक कंपन्यांचे नुतनीकरणास करण्याबाबत सुचित केले आहे.

उपरोक्त वाचा येथिल अ.क्र.१ ते ६ वरील या विभागाचे आदेशाव्दारे नोंदणीस मान्यता देण्यात आलेल्या सुक्ष्म सिंचन संच उत्पादक कंपन्यां पैकी सर्वदृष्टया वैध असलेल्या व भारतीय मानक ब्युरोचे (BIS) वैध प्रमाणपत्र तसेच, जीएसटीएन व डीआयएन क्रमांकाचे प्रमाणपत्र धारण करणाऱ्या सोबत जोडलेल्या ***परिशिष्ट- १*** मध्ये नमूद केलेल्या ***०४ ठिबक सिंचन संच उत्पादक कंपन्यांना*** सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी नुतनीकरणास व त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या जिल्हयामध्ये सुक्ष्म सिंचनाची कामे करण्यास खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१. सूक्ष्म सिंचन योजना अंमलबजावणीसाठी या आदेशान्वये ठिबक सिंचन संच उत्पादक कंपन्यांच्या नुतनीकरणास देण्यात आलेली मान्यता सन **२०१८-१९** या आर्थिक वर्षापुरती वैध राहील.
२. ***या आदेशान्वये नोंदणी नुतनीकरणास मान्यता देण्यात आलेल्या कंपन्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या प्रत्येक घटकांच्या बीआयएस वैध मुदतीपर्यंतच त्या कंपनीची नोंदणी नुतनीकरण राहिल. बीआयएस नुतनीकरणाची कागदपत्रे विहित मुदतीत कृषि आयुक्तालयास सादर करण्याची जबाबदारी संबंधीत***

***कंपनीची राहील. अशी कागदपत्रे वेळेत सादर न केल्यास त्या कंपनीचे नुतनीकरण घटकनिहाय बीआयएस मुदतीच्या अंतिम तारखेनंतर आपोआप रद्द होईल.***

३. नुतनीकरणाच्या वेळी नोंदणीकृत कंपन्यानी सादर केलेल्या दरपत्रकातील दरापेक्षा जास्त दराने, कोणत्याही घटकांची विक्री करता येणार नाही. तसेच सदरचे दरपत्रक कृषि आयुक्तालयाच्या इ-ठिंबक आज्ञावलीवर नोंदणीकृत कंपन्यानी भरणे आवश्यक आहे. नोंदणीकृत कंपन्यांनी त्यांच्या दरपत्रकात त्या आर्थिक वर्षात वाढ किंवा घट केल्यास इ-ठिंबक आज्ञावलीवर भरणे व कृषि आयुक्तालयास त्वरित कळविणे त्यांचेवर बंधनकारक राहील.

४. मार्गदर्शक सुचनामध्ये नमूद केल्यानुसार प्रत्येक जिल्हयातील उभारणी केलेल्या विक्रिपश्चात सेवा केंद्राची आवश्यक ती माहिती जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना सादर करुन त्यांची तपसाणी करुन घेण्याची जबाबदारी संबधीत सुक्ष्म सिंचन संच उत्पादक कंपन्यांची राहील. नुतनीकरणास मान्यता प्राप्त होताच विक्रीपश्चात सेवा केंद्राची एक महिन्यात तपासणी करुन घेऊन त्याचा अहावाल कृषि आयुक्तालयास सादर करण्याच्या अटीच्या अधिन राहून सन २०१८-१९ साठी नुतनीकरणास मान्यता देण्यात येत आहे

५. नुतनीकरणास मान्यता देण्यात आलेल्या सुक्ष्म सिंचन संच उत्पदक कंपन्यांच्या अधिकृत वितरकाने विहीत नमुन्यात साठा नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. सदरची नोंदवही तालुका कृषि अधिकारी यांच्याकडून प्रमाणित करणे बंधनकारक राहील. तसेच नुतनीकरणास मान्यता दिलेल्या कंपनीने उत्पादीत केलेल्या व वितरकांना पुरवठा केलेल्या सर्व घटकांचा घटकनिहाय अहवाल दरमहा महिना संपताच पुढील माहिन्याच्या १० तारखेपर्यत कृषि आयुक्तालयाने दि.०९ फेब्रुवारी,२०१८ रोजीच्या पत्राव्दारे विहीत केलेल्या प्रपत्रामध्ये सादर करणे आवश्यक राहील.

६. केंद्र, राज्य शासन, कृषि आयुक्तालयस्तरावरुन वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या सुचना, अटि व शर्ती सुक्ष्म सिंचन संच उत्पादक कंपन्या व त्यांच्या अधिकृत वितरकांवर बंधनकारक रहातील.

**सोबतः नुतनीकरणास मान्यता देण्यात
आलेल्या ठिबक सिंचन संच उत्पादकांची यादी.**

**संचालक,फलोत्पादन**
कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे

**प्रति,**

मे. -----------------------------------
-----------------------------------
-----------------------------------
-----------------------------------

**प्रतिलिपी - यांना माहितीसाठी व पुढील प्रमाणे कार्यवाहीसाठी अग्रेषीत.**

**१) विभागीय कृषि सहसंचालक, सर्व**

**२) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, (सर्व)**

२/- सन २०१८-१९ या वर्षासाठी नुतनीकरणास मान्यता देण्यात आलेल्या परिशिष्ट-१ मधिल सुक्ष्म सिंचन संच उत्पादकांचे जिल्हानिहाय अधिकृत विक्रेते / वितरकांची जिल्हास्तरावर संबधीत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी नोंदणी करणे बंधनकारक आहे. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी वितरक नोंदणीसाठी आवश्यक असलेले व कृषि आयुक्तालयाने विहित केलेले ***शुल्क रु.२७५०/- (अक्षरी रु.दोन हजार सातशे पन्नास फक्त) ग्रासप्रणालीव्दारे /चलनाव्दारे खालील लेखाशिर्षांतर्गत भरुन घ्यावे.*** तसेच रु.१०,०००/- (अक्षरी रु.दहा हजार फक्त) रकमेची बँक गॅरंटी घेवून वितरकांची नोंदणी करावी. (ठिबक व तुषार या करीता शुल्क स्वतंत्र भरण्याची आवश्यकता नाही)

**मागणी क्र.डी.-१**
**०४०१ - पीक संवर्धन**
**८००, इतर जमा रकमा**
**(०१)(१२) इतर बाबी**
**(०४०१०४५५)**

३/- संबधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व त्यांचे जिल्हातील सुक्ष्म सिंचन वितरक या दोघामधील कृषि आयुक्तालयाने विहित करुन दिलेल्या नमुन्यातील करारनामा जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी रु.१००/- च्या स्टँम्प पेपरवर नोटराइज्ड करुन घ्यावा.

४/- नोंदणीकृत कंपनीच्या जिल्हयातील विक्रिपश्चात सेवा केंद्राची तपासणी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी स्वत: किंवा त्यांचे अधिनस्त असलेल्या गट-अ अथवा गट-ब मधील अधिकाऱ्यांमार्फत कंपनीची कृषि आयुक्तालयस्तरावरुन नोंदणी झाल्यापासून एक महिन्याच्या आत करुन त्यास मान्यता द्यावी.

**संचालक,फलोत्पादन**
कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे

परिशिष्ट-१

## सन २०१६-१७ मध्ये नोंदणीस मान्यता देण्यात आलेल्या ठिबक सिंचन संच उत्पादकांची सन २०१८-१९ मधिल नुतनीकरण यादी

| अ. क्र. | कंपनीचे नाव / पत्ता / संपर्क क्रमांक व इमेल | जी.एस.टी.एन. / डी.आय.एन.क्रमांक | बी.आय.एस.नोंदणीक्रमांक व त्याचा वैधताकालावधी | | | | मान्यताप्राप्त जिल्हे | वैधता कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | lateral BIS- 12786 CML no. & validity | Emiiter (online) BIS- 13487 CML no. & validity | Inline BIS- 13488 CML no. & validity | Filter BIS- 12785 CML no. & validity with brand name | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ९ | १० |
| १ | मे.इरिलिंक ड्रीप इरिगेशन इंडस्ट्रीज, ३-शुभ कॉम्प्लेक्स, विश्वकर्मा मंदीराजवळ, हायवे,दिसा-३८५५३५, गुजरात | 27AADF15081N1ZZ / भागीदारी फर्म आहे. | 2510538 Dt.02.07.2019 | 8400007009 Dt.16.03.2020 | 2510639 Dt.02.07.2019 | 2814053 Dt.31/10/2018<br><br>7714781 Dt.01.03.2019 | औरंगाबाद, बीड, जालना, हिंगोली (एकूण जिल्हे - ०४) | २०१६-१७ ते २०१८-१९ |
| २ | मे.कोठारी ॲाग्रीटेक प्रा.लि., १८५ ते १९३, चंद्रमाऊलीइंडस्ट्रीयलको-ऑप इस्टेट,मोहोळ, जि.सोलापूर - ४१३२१३ sales@kotharipipes.co.in | 27AACCK8017 H1ZI / 00423658 00423735 00423813 01483162 05270588 | 7368485 dt.31.01.2020<br><br>7500160707 Dt.06.12.2018 | 7397391 dt.31.01.2020 | 7443271 dt. 31.01.2020<br><br>7500160513 Dt.06.12.2018 | 3889901 dt.31.03.2019 3006128 dt.30.06.2018 7272068 Dt.31/07/2018 | नांदेड,परभणी, जालना, लातूर,औरंगाबाद, अहमदनगर, बीड, हिंगोली, नागपूर, वर्धा, गोंदिया, अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, कोल्हापूर, नाशिक, जळगांव, धुळे, नंदूरबार, उस्मानाबाद, पुणे, सांगली, सातारा, सोलापूर,ठाणे, रत्नागीरी, रायगड,वाशिम (एकुण २९ जिल्हे) | २०१६-१७ ते २०१८-१९ |

संचालक,फलोत्पादन
कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे

| अ. क्र. | कंपनीचे नाव / पत्ता / संपर्क क्रमांक व इमेल | जी.एस.टी.एन. / डी.आय.एन.क्रमांक | बी.आय.एस.नोंदणीक्रमांक व त्याचा वैधताकालावधी | | | | मान्यताप्राप्त जिल्हे | वैधता कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | lateral BIS- 12786 CML no. & validity | Emiiter (online) BIS- 13487 CML no. & validity | Inline BIS- 13488 CML no. & validity | Filter BIS- 12785 CML no. & validity with brand name | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ९ | १० |
| ३ | मे.कॅप्टन पॉलीप्लास्ट लि., स.नं.२६७, प्लॉट नं.१०अे, १०बी व ११ अे, एन.एच.८-बी, शापर(वेरावळ), जि.राजकोट,गुजरात ३६००२४ info@captainpolyplast. com | 27AAACC8608F1ZS / 00087859 00127947 00127951 06678731 06693942 07189331 | 7270367 dt.04.07.2018 | 3775276 dt.20.11.2018 | 7580079 dt.02.01.2019 | 2829773 dt.03.12.2018 7714781 dt.01.03.2019 3006128 dt.30/06/2018 | अकोला,बुलडाणा,पुणे, उस्मानाबाद,लातूर,परभणी, हिंगोली (एकुण ०७ जिल्हे) | २०१६-१७ ते २०१८-१९ |
| ४ | मे.पॅरागॉन इरिगेशन लि. (सिंन्थेटिक्स ॲण्ड पॉलिमर्स) लि.,१०२/२,जी.आय. डी.सी., मकरपुरा,वडोदार, गुजरात - ३९००१० hdpe@paragonpipe. com | 27AABCP2708E1ZR / 0001688274 0001688328 0001710343 0001710349 0001710352 0002778617 | 7300956 Dt.21.12.2018 | 7577393 Dt.14.12.2018 | 7577696 Dt.15.12.2018 | 3006128 Dt.30/06/2018 7714781 Dt-1/03/2019 | बीड, नांदेड, हिंगोली (एकूण जिल्हे - ०३) | २०१६-१७ ते २०१८-१९ |

संचालक,फलोत्पादन
कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे